मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, नागपूर यांच्या आस्थापनेवरील २४ अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.एमसीटी-२०१६/प्र.क्र.७५/परि-५

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०१७.

<u>वाचा</u> : १) गृह विभाग, शासन अधिसूचना क्र.एमसीटी-०१/२०००/९३/प्र.क्र.१६/परि.५, दिनांक ५.११.२००१

२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमसीटी-२०१६/प्र.क्र.७५/परि.५, दिनांक २१.११.२०१७.

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. क्र /२०१६ पदनि.प्र,.क.पु.आ/८.क्र. दिनांक ०३.१०.२०१७

४) अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, नागपूर यांचे पत्र जा. क्र.१७४/२०१७, दिनांक ४ जून, २०१७.

५) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमसीटी-२०१६/प्र.क्र.७५/परि.५, दिनांक २१.०८.२०१७.

<u>प्रस्तावना -</u>

उपरोक्त संदर्भाधिन क्र. १ येथील शासन अधिसूचनेन्वये नागपूर जिल्ह्यासाठी दोन स्वतंत्र मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे स्थापन करण्यात आलेली आहेत. सदर न्यायाधिकरणाच्या आस्थापनेवरील एकूण २४ अस्थायी पदांना संदर्भाधिन क्र.५ येथील शासन निर्णयान्वये दिनांक १.९.२०१७ ते ३१.०८.२०१८ पर्यंत (१ वर्ष) मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सदर पदांना दिनांक १.९.२०१७ ते ३०.०९.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर २४ पदांची मुदतवाढ दिनांक ३१.०८.२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने उक्त पदांना दि.०१.०९.२०१७ ते दि.३१.०८.२०१८ पर्यंत (१ वर्ष) मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भाधिन क्र. ४ येथील पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. संदर्भाधिन क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये अस्थायी पदांना दिनांक ०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार संदर्भाधीन क्र.५ येथील शासन निर्णय रद्द करून मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, नागपूर यांच्या आस्थापनेवरील २४ अस्थायी पदांना दिनांक ०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

संदर्भाधीन क्र.५ येथील शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे. मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, नागपूर या कार्यालयाच्या आस्थापने अंतर्गत खालील २४ अस्थायी पदांना प्रलंबित दावे त्वरित निकाली काढण्याच्या तसेच निकाली काढलेल्या दाव्यांचे प्रत्येक ३ महिन्यानंतर शासनास विवरणपत्र सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून दिनांक ०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	अस्थायी (तात्पुरती पदे)
१.	सदस्य	२
२.	प्रबंधक	२
३.	उच्च श्रेणी लघुलेखक	२
४.	वरिष्ठ श्रेणी लिपिक	२
५.	कनिष्ठ श्रेणी लिपिक	६
६.	बेलिफ	४
७.	हवालदार	२
८.	शिपाई	४
	एकूण	२४

या बाबीवरील होणारा खर्च “मागणी क्र. बी-३, २०४१, वाहनांवरील कर, (००) ८००, इतर खर्च, (००) (०१) मोटार अपघात दावा न्यायाधिकरण (२०४१ ०१२५)” या लेखाशिर्षाखालील सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक., दि. ०३.१०.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१७११२२१६५४३२०१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Kranti B. Patil

Digitally signed by Kranti B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ff9761db1faa1460e27b4ede45ea0686471259 0bd05d7ff12b360f63975c0187, cn=Kranti B. Patil
Date: 2017.11.22 16:58:34 +05'30'

(क्रांती पाटील)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रति,

१. अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण तथा विभाग प्रमुख, मुंबई.
२. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील साईड), मुंबई.
३. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर.
४. अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, नागपूर.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र -२, नागपूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
७. वित्त विभाग (व्यय-८/ वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई
८. गृह विभाग (बीयुडी-१), मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती/ परिवहन-५